जा.क्र. रा.व्य.क.ग्रा.गृ/बांध/ग्रागृअ/१४७/२०१७
राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण
सिडको भवन, ५वा मजला, दक्षिण कक्ष,
बेलापूर, नवी मुंबई. दिनांक - ०८/०६/२०१७

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जिल्हा परिषद (सर्व)**

विषय :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गतच्या घरकुलांच्या नजर तपासणी नोंदीबाबत.

संदर्भ - १. ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन परिपत्रक इंआयो -२०१४/प्र.क्र०१/योजना-१० दि.१२/०२/२०१४.

२. केंद्र शासनाच्या इंदिरा आवास योजनेच्य अंमलबजावणी अनुषंगाने निर्गमित जून २०१४ ची मार्गदर्शक तत्वे.

३. नियोजन विभाग यांचे शासन निर्णय क्रमसंक-मग्रारो-२०१४/प्र.क्र.६४अ/रोहयो-१०अ दि. ३०/०५/२०१५.

४. ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक:पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३९/योजना-१०. दि.२७/०५/२०१६

५. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे पत्र जा.क्र.३०१/प्रमंआयोग्रा-ग्रागृअ/२०१६ दि. ३१/०५/२०१६.

६. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मार्गदर्शक तत्वे २०१६.

राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण विभागामार्फत राबविण्यात येणा-या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य ग्रामीण गृह निर्माण योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील रमाई आवास योजना, आदिवासी विभागाकडील शबरी घरकुल योजना, पारधी विकास घरकुल योजना, आदिम जमातीसाठी घरकुल योजना, गृह निर्माण विभागाकडील राजीव गांधी निवारा योजना क्र.१ व २ जिल्हा स्तरावरून प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाद्वारे व तालुका स्तरावरून गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेद्वारे राबविण्यात येत आहेत. सदरील योजनांच्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी व परिणामकारकरित्या अमंलबजावणीच्या दृष्टीने राज्यामध्ये बाह्य यंत्रणेद्वारे आठशे ग्रामीण गृहनिर्माण अभियंते मनुष्य बळ उपलब्ध करून घेण्यात आलेले आहे. सदरील बाह्य यंत्रणेद्वारे उपल्बध करून घेण्यात आलेल्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची कर्तव्ये व जबाबदा-या संदर्भ क्रमांक.५ अन्वये कळविण्यात आलेले आहेत. तथापि क्षेत्रीय स्तरावरून ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी घरकुलाच्या नोंदी मोजमाप पुस्तीकेमध्ये नोदवावे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने इंदिरा आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत निर्गमीत करण्यात आलेले शासन निर्णय/ शासन परिपत्रक/ सुचना यांची सांगड घालून खालीप्रमाणे कळविण्यात येत आहे.

शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन परिपत्रक इंआयो - २०१४/प्र.क्र०१/योजना-१० दि.१२/०२/२०१४. मध्ये घरकुल बांधकामाची तपासणी शिर्षाखाली इंदिरा आवास योजना बांधकाम तपासणी मध्ये पहीली नजर तपासणी, दुसरी नजर तपासणी व तिसरी अंतिम तपासणी संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत व त्यानुसार करावयाच्या निधी वितरणाबाबत नमुद केलेले आहे.

ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३९/योजना-१०. दि.२७/०५/२०१६ अन्वये ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना टप्पा निहाय देय मानधन संदर्भात नमुद केले आहे. त्यानुसार सदरील टप्पा निहाय मानधन सुलभतेने वितरण करणेसाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी करावयाच्या कामाची सांगड घालुन खालील प्रमाणे टप्पा निहाय देय मानधन वितरीत करणेची कार्यवाही करावी.

| अ.क्र | कामाचा टप्पा | देय मानधन | | ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | डोंगराळ व दुर्गम भाग, I.A.P Districts. | इतर भाग | |
| १ | जोत्या पर्यंत पूर्ण | रु.२५०/- | रु. २००/- | पहिली नजर तपासणी जोत्या पर्यंतचे काम पूर्ण झाल्यानंतर करुन विहीत नमुन्यात M Book मध्ये नोंद करावी. दुसरा हप्ता वितरीत करणेसाठी. |
| २ | लिन्टेंल लेव्हल पर्यंतचे काम पूर्ण | रु.२५०/- | रु. २००/- | दुसरी नजर तपासणी घरकुलांची भौतीक प्रगती लिंटेल लेव्हल पर्यंत झालेली आहे याची खात्री करून याबाबतची नोंद विहीत केलेल्या नमुन्यात M Book मध्ये करावी. |
| ३ | छतासह छत पातळीपर्यंचे काम पूर्ण | रु.२५०/- | रु. २००/- | तिसरी नजर तपासणी घरकुलाची भौतीक प्रगती छतासह छत पातळीपर्यंतचे काम झालेले आहे याची खात्री करून याबाबतची नोंद विहीत केलेल्या नमुन्यात M Book मध्ये करावी |
| ४ | घरकुलाचे बांधकाम शौचालयासह पूर्ण | रु.२५०/- | रु. १५०/- | चौथी अंतिम तपासणी घरकुलाचे बांधकाम शौचालयासह पूर्ण झालेले आहे याची खात्री करून विहीत नमुन्यात नोंद M Book मध्ये करावी. तिसरा व अंतिम हप्ता वितरीत करण्यासाठी. |

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अकुशल भागाचे अभिसरण करताना घरकुल बांधकामाच्या नोंदी M Book मध्ये नोंदविण्या संबधिच्या सुचना केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या आहेत. त्यामुळे याच मोजमाप पुस्तीकेत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलाच्या कामाची टप्पा निहाय नजर पहाणी नोंद देखील करावी जेणे करून घरकुल अभिलेखे एकाच मोजमाप पुस्तीकेत एकत्रित जतन व उपलब्ध होतील.

टप्पानिहाय कामे पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतच्या नोंदी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी M Book मध्ये कराव्यात तसेच अशा नोंदी करतांना कामाचे ढोबळ मानाने क्षेत्रफळ चौ.मी.मध्ये आणि नजरी मुल्यांकन रक्कम M Book मध्ये नोंद करुन दिनांकात स्वाक्षरी करावी.(सोबत टप्पानिहाय काम पूर्ण झाल्या नंतर करावयाच्या नोंदी बाबत नमुना नोंदी दर्शविल्या आहेत). घरकुल पूर्ण झाल्यानंतर कामाचे पूर्णत्वाचे दाखले सोबत दिलेल्या नमुन्यात तयार करुन ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यानी स्वाक्षरी करावी व सदरिल प्रमाणपत्र संबंधित उपविभागाच्या उप अभियंता जि.प.बांधकाम/उप अभियंता जि.ग्रा.वि.यं. यांनी स्वाक्षरी करुन अंतिमीकरणाचे प्रमाणपत्र दयावे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामासाठी "एक काम दोन मोजमाप पुस्तीका" ह्या प्रमाणे घरकुलाचे बांधकामामध्ये मनरेगा कामाच्या अभिसरणासाठी मोजमाप पुस्तीका देण्यात येतात. ह्याच मोजमाप पुस्तीकेमध्ये इंदिरा आवास योजना/ प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, राज्य ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गतच्या घरकुलांची नजर तपासणी नोंदी करावयाच्या आहेत. जेणे करून मनरेगा अभिसरण अंतर्गच्या कामाच्या नोंदी व घरकुलांच्या नजर तपासणी बाबतच्या नोंदी एकत्रित उपलब्ध होतील. हे अभिलेखे गट विकास अधिकारी यांच्या स्तरावर जतन करून ठेवावेत.

(भारत शेंडगे)
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

सोबत:- पहिली नजर तपासणी, दुसरी नजर तपासणी, तिसरी नजर तपासणी, चौथी अंतिम नजर तपासणी बाबतच्या नमुना नोंदी तपशील आणि पुर्णत्वाचा दाखला.

प्रतिलिपी:-

१. मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सादर
२. मा. सचिव, नियोजन विभाग (रोहयो कक्ष), महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव सादर
३. मा.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय--------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव

(भारत शेंडगे)
संचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

सोबत:- पहिली नजर तपासणी, दुसरी नजर तपासणी, तिसरी नजर तपासणी, चौथी अंतिम नजर तपासणी बाबतच्या नमुना नोंदी तपशील आणि पुर्णत्वाचा दाखला.

**पहिली नजर तपासणी**

**(अ) जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण:-**

लाभधारकाचे नाव-

घरकुलाचे जोत्यापर्यंतचे बांधकाम समाधानकारक रित्या पूर्ण झालेले असुन या कामाचे क्षेत्रफळ ---- चौ.मी. इतके आहे. या कामाचे नजरी मुल्यांकन रु. इतके आहे.
करिता प्रमाणित करुन नोंद करण्यात येत आहे.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याचे नाव व दिनांकीत स्वाक्षरी

**दुसरी नजर तपासणी**

**(ब) लिंटेलपर्यंतचे बांधकाम पूर्ण:-**

लाभधारकाचे नाव-

घरकुलाचे लिंटेलपर्यंतचे बांधकाम समाधानकारक रित्या पूर्ण झालेले असुन या कामाचे क्षेत्रफळ ---- चौ.मी. इतके आहे. या कामाचे नजरी मुल्यांकन रु. इतके आहे.
करिता प्रमाणित करुन नोंद करण्यात येत आहे.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याचे नाव व दिनांकीत स्वाक्षरी

**तीसरी नजर तपासणी**

**(क) छतासह छतपातळीपर्यंतचे बांधकाम पूर्ण:-**

लाभधारकाचे नाव-

घरकुलाचे छतासह छतपातळीपर्यंतचे बांधकाम समाधानकारक रित्या पूर्ण झालेले असुन या कामाचे क्षेत्रफळ ---- चौ.मी. इतके आहे. या कामाचे नजरी मुल्यांकन रु. इतके आहे.
करिता प्रमाणित करुन नोंद करण्यात येत आहे.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याचे नाव व दिनांकीत स्वाक्षरी

**चौथी अंतिम नजर तपासणी**

**(ड) शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पूर्ण:-**

लाभधारकाचे नाव-

घरकुलाचे शौचालयासह बांधकाम समाधानकारक रित्या पूर्ण झालेले असुन या कामाचे क्षेत्रफळ ---- चौ.मी. इतके आहे. या कामाचे नजरी मुल्यांकन रु. १.५० लक्ष रकमेपेक्षा जास्त आहे.
करिता प्रमाणित करुन नोंद करण्यात येत आहे.

ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याचे नाव व दिनांकीत स्वाक्षरी

## पूर्णत्वाचा दाखला

### प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सन --------------

१. लाभधारकाचे नाव :---------------- रा.-------- ता.--------- जि.---------

२. योजनेचे नाव व वर्ष:-

३. काम मंजुर झाल्याचा आदेश क्र. व दिनांक :

४. घरकुल काम शौचालयासह पूर्ण झाल्याचा दिनांक :

प्रमाणित करण्यात येते की, वरिल नमुद घरकुल

i) शौचालयासह पूर्ण झालेले आहे.

ii) घरकुलाचा कामाचा दर्जा समाधानकारक आहे.

iii) घरकुलाचे क्षेत्रफळ साधारणत: ----- चौ.मी. असुन किमान २५ चौ.मी मर्यादापेक्षा जास्त आहे.

iv) घरकुलांचे नजरीमुल्यांकन रु.------.

करिता वरिलप्रमाणे कामासाठी पूर्णत्वाचा दाखला देण्यात येत आहे.

कामासाठी वापरलेल्या मोजमाप पुस्तीका क्रंमाक :

ग्रामीण गृहनिर्माण अभियंता

प.स.---------

जि.

उपअभियंता

जि.प.उपविभाग

जि.-------------